**ठळक बातम्या**

- महायुती आणि महाविकास आघाडीचं जागावाटप येत्या एक-दोन दिवसांत जाहीर होणार

- समाजवादी पक्षाकडून राज्यात महाविकास आघाडीकडे १२ जागांची मागणी

- विधानसभा निवडणुकीसाठी पात्र मतदारांना नोंदणी करण्यासाठी आज रात्री बारा वाजेपर्यंत संधी

**आणि**

- ज्येष्ठ पत्रकार, लेखिका अनुराधा औरंगाबादकर यांचं दीर्घ आजारानं निधन

**<><><><><>**

राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी महायुती आणि महाविकास आघाडी च्या मोर्चेबांधणीला वेग आला आहे. महायुतीमध्ये केवळ ३०-३५ जागांवर सहमती व्हायची आहे. एक-दोन दिवसात हे जागा वाटप जाहीर होईल अशी माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. नवी दिल्लीत ते आज वार्ताहरांशी बोलत होते. भाजपाच्या उमेदवारांची यादी लवकरच जाहीर होईल, अशी माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिली. अंतिम झालेल्या जागांवरचे उमेदवार महायुतीतले पक्ष लवकरच जाहीर करतील, असंही ते म्हणाले.

राज्यातल्या २८८ जागांपैकी भाजपाला दीडशे, शिवसेना ८७ ते ९० आणि राष्ट्रवादी काँग्रेस ५० जागांवर लढण्यासाठी इच्छुक आहे असं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे.

**<><><><><>**

महाविकास आघाडीत कोणतेही मतभेद नसून तिन्ही पक्ष एकत्र येऊन निवडणूक लढणार आहेत, येत्या दोन दिवसांत जागावाटपाची चर्चा पूर्ण होईल, असं काँग्रेस प्रभारी रमेश चेन्निथला यांनी मुंबईत वार्ताहरांशी बोलताना सांगितलं. आगामी विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडी हाच आपला चेहरा आहे, एकजुटीने भाजपाशी लढू आणि सरकार स्थापन करू, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

त्याआधी चेन्निथला यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांची भेट घेतली. तसंच ज्येष्ठ नेते शरद पवार यांची भेट घेऊन चर्चा केली.

मुंबईत टिळक भवन इथं काँग्रेसची बैठक आज झाली. यात प्रभारी रमेश चेन्निथला यांच्यासह विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, विधान परिषदेतले काँग्रेसचे गटनेते सतेज पाटील उपस्थित होते.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसच्या निरीक्षकांची बैठक टिळक भवन इथं झाली. या बैठकीत निवडणुकीच्या अनुषंगाने सविस्तर चर्चा करण्यात आल्याचं काँग्रेसच्या प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे. या बैठकीला प्रदेश प्रभारी रमेश चेन्निथला, ज्येष्ठ नेते अशोक गेहलोत, भुपेश बघेल,

पृथ्वीराज चव्हाण, चरणजीत सिंग चन्नी, जी. परमेश्वर, एम बी पाटील, उत्तम कुमार रेड्डी, टी एच सिंह देव उपस्थित आहेत.

**<><><><><>**

राज्य सरकार सर्व पातळ्यांवर अपयशी ठरल्यानं महिलांना पैसे वाटप करण्याची वेळ या सरकारवर आल्याची टीका समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी केली. धुळे शहर मतदारसंघातून इर्शाद जहागीरदार यांना पक्षाकडून उमेदवारी जाहीर केल्यानंतर आयोजित सभेत ते आज बोलत होते. महायुतीचं सरकार हे धर्मा धर्मात तेढ निर्माण करणारं, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यातही भ्रष्टाचार करणारं सरकार आहे, असा आरोपही यादव यांनी केला. महायुतीचं सरकार हटवून महाविकास आघाडीचं सरकार बनवण्याचं आवाहन यावेळी अखिलेश यादव यांनी केलं.
धुळे आणि मालेगावसह राज्यातल्या १२ जागांची मागणी समाजवादी पक्षाने महाविकास आघाडीकडे केली असल्याचं, यादव यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीसाठी ज्या पात्र मतदारांनी अद्याप नावनोंदणी केलेली नाही त्यांना आजचा दिवस संधी आहे. आज रात्री १२ वाजेपर्यंत मतदार नोंदणीचे अर्ज स्वीकारले जाणार आहेत. केंद्रीय निवडणूक आयोगानं जाहीर केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार, नामनिर्देशन पत्र सादर करण्याची मुदत २९ ऑक्टोबरपर्यंत आहे. नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या शेवटच्या दिवसाच्या १० दिवसांपूर्वी मतदार नोंदणी करता येते. मतदार नोंदणीचे अर्ज संबंधित मतदार नोंदणी अधिकारी, विधानसभा निवडणूक कार्यालयात उपलब्ध आहेत. त्या कार्यालयात अर्ज भरून जमा करावयाचे आहेत. तसेच

ऑनलाईन मतदार नोंदणी करण्यासाठी voters.eci.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी आणि अधिक माहितीसाठी टोल फ्री हेल्पलाईन क्रमांक १९५० वर संपर्क साधावा. व्होटर हेल्पलाईन ॲपद्वारे मतदारांना आपले नाव तपासता येईल आणि नवीन मतदार नोंदणीही करता येईल, असे जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयातून सांगण्यात आले.

<><><><><>

महाराष्ट्राची अर्थव्यवस्था सध्या वाईट स्थितीत असून पुढील काळात राज्यावर आर्थिक संकट ओढवू शकतं असं राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्याध्यक्ष सुप्रिया सुळे यांनी म्हटलं आहे. त्या आज मुंबईत वार्ताहरांशी बोलत होत्या.

राज्य सरकार कर्जाच्या ओझ्याखाली असूनही कोट्यवधींच्या जाहिरातींसाठी करदात्याच्या पैशांची उधळपट्टी करत असल्याचा आरोप त्यांनी केला. राज्याच्या आर्थिक परिस्थितीबद्दल अर्थतज्ञ  तसंच भारतीय जनता पक्षासह  मित्रपक्षांचे  नेते चिंता व्यक्त करत आहेत, आणि असंच सुरू राहिल्यास राज्य सरकारला कर्मचाऱ्यांचा पगार देणंही अवघड होऊ शकतं, असं त्या म्हणाल्या.

<><><><><>

माजी मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते राजेंद्र शिंगणे यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला. पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या उपस्थितीत प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी त्यांचं पक्षात स्वागत केलं.

<><><><><>

येत्या विधानसभा निवडणुकीच्या संदर्भात फेसबुक, इंस्टाग्राम, ट्विटर, यु ट्यूब इत्यादीं समाजमाध्यमांवर अनेक खोट्या आणि मतदारांमध्ये संभ्रम निर्माण करणाऱ्या पोस्ट प्रसारित होत आहेत. त्या काढून टाकण्यासाठी संबंधित समाजमाध्यमांच्या नोडल अधिकाऱ्यांना राज्य पोलिसदलाच्या सायबर शाखेने  नोटीसा पाठवल्या आहेत. आतापर्यंत अशा सतराशेहून जास्त पोस्ट निदर्शनास आल्या असून त्यातल्या ३०० पोस्ट काढून टाकण्यात आल्या आहेत.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज नाशिक जिल्ह्यातल्या ७ मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

भारतीय गहू आणि बार्ली संशोधन संस्था कर्नाल यांनी आज केंद्र सरकारनं मंजूर केलेल्या गव्हाच्या १३ नवीन वाणांच्या बियाणांचं वितरण सुरु केलं आहे. नवीन वाणांचं बियाणं घेण्यासाठी देशभरातल्या २२ हजार शेतकऱ्यांनी पोर्टलवर नोंदणी केली होती. गव्हाचं नवीन वाण अधिक उत्पादन देण्याबरोबरच रोग प्रतिबंधक आहे. बार्ली वाण DWRV 137 चा देखील गव्हाच्या मान्यताप्राप्त वाणांमध्ये समावेश करण्यात आला आहे. याचा उपयोग जनावरांच्या चाऱ्यातल्या पेंढ्यामध्येही उपयोग करता येईल. गेल्या वर्षी ११३ पूर्णांक २९ दशलक्ष टन विक्रमी उत्पादन झालं होतं, परंतु यंदा

त्याही पेक्षा अधिक ११५ दशलक्ष टन गहू उत्पादनाचं उद्दिष्ट ठेवण्यात आलं असल्याचं संस्थेचे संचालक डॉ. रतन तिवारी यांनी सांगितलं.

**<><><><><>**

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या पाच पिकांच्या वाणाचा समावेश भारताच्या राजपत्रात करण्यात आला आहे. याबाबत केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयानं अधिसूचना प्रसिद्ध केली आहे. यात परभणी चणा-१६, सोयाबीनच्या एमएयूएस ७३१, देशी कापसाच्या पीए ८३३, अमेरिकन कापसाच्या एनएच ६७७ आणि तिळाच्या टीएलटी १० या वाणांचा समावेश आहे. हे वाण विकसित करण्यासाठी महत्त्वाचं योगदान देणाऱ्या वैज्ञानिकांचं अभिनंदन कुलगुरूंनी केलं आहे.

**<><><><><>**

नक्षलवादी चळवळीत सक्रीय असणाऱ्या एका दाम्पत्यानं आज गडचिरोली पोलिसांपुढे आत्मसमर्पण केलं. असिन राजाराम कुमार आणि अंजू सुळ्या जाळे अशी या दोघांची नावं आहेत. असिन हा ओदिशातील नक्षल चळवळीच्या प्रेस टीममध्ये एरिया कमिटी मेंबर म्हणून काम करायचा तर अंजू ही याच दलममध्ये सदस्य होती. २०२२ पासून आतापर्यंत २९ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केलं आहे.

**<><><><><>**

ज्येष्ठ पत्रकार, प्रथितयश लेखिका अनुराधा औरंगाबादकर यांचं काल दीर्घ आजारानं पुण्यात निधन झालं. त्या ८६ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पार्थिवावर पुण्यात अंत्यसंस्कार करण्यात आले. डॉ. अनुराधा औरंगाबादकर यांनी १९७० साली पत्रकारितेतून आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली.

त्यांची ९० पुस्तकं प्रकाशित झाली आहेत. हिंदी, मराठी चित्रपट सृष्टीसह त्यांनी विविध विषयांवर विपुल लेखन केलं. नाशिक सार्वजनिक वाचनालयाच्या व्यवस्थापन समितीवरही त्यांनी काम केलं असून वृत्तपत्र विद्या पदवी परीक्षेत त्या पुणे विद्यापीठात द्वितीय तर तर केंद्रात प्रथम आल्या होत्या. काही काळ त्यांनी प्राध्यापकीही केली, त्यांच्या प्रबंधासाठी त्यांना पुरस्कारही मिळाला होता.

**<><><><><>**

येत्या चोवीस तासांत कोकण आणि  मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी तर विदर्भ आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह जोरदार  पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेने वर्तवली आहे.

//<><><><><>//